
# महिला सक्षमीकरण: स्वरूप आणि विकास

संपादक
प्रा. पांडूरंग मुट्ठे



Scanned with CamScanner

**Women Empowerment : It's Nature and Development**
**Editor - Asst. Prof. Pandurang R. Muthe**

**महिला सक्षमीकरण : स्वरूप आणि विकास**
**संपादक - प्रा.पांडूरंग रा. मुट्ठे**

**ISBN 978-93-5240-041-6**

**अरुणा प्रकाशन**
**१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,**
**खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर**
**मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७**

**©** **सर्व हक्क संपादकाधीन**

**: प्रथम आवृत्ती :- २७ फेब्रुवारी २०१६**

**: मुद्रक :** आर्टी ऑफसेट, लातूर

**अक्षर जुळवणी :** हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

**मुखपृष्ठ :-** विरु गुळवे (मो. ८६००८८११२७)

**स्वागत मूल्य : ६००.०० रुपये**

* **'महिला सक्षमीकरण : स्वरूप आणि विकास' या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नव्हे.**

५८. भारतीय स्त्री-जीवन : एक दृष्टिक्षेप .................................................. २९६
**डॉ. अनुराधा हणमंतराव पाटील**

५९. पंचायतराज व्यवस्था व महिला सक्षमीकरण : एक अध्ययन .............. ३०५
**प्रा.डॉ.डी.के. कदम**

६०. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्थेत व प्रशासनात महिलांचा सहभाग ..... ३११
**प्रा.डॉ. उलगडे एल.के., प्रा. कुंभारकर के.जी.**

६१. प्रतिनिधीत्वाचा मुद्दा - महिला आरक्षण ................................................ ३१४
**प्रा. माधव चोले**

६२. पंचायतराज आणि महिला सक्षमीकरण .................................................. ३२१
**बर्चे कमल दिगांबर**

६३. पंचायतराज व्यवस्थेत स्त्रियांचा सहभाग ................................................ ३२५
**प्रा.महादेव माणिकराव हारगे**

६४. पंचायत राज्य व्यवस्थेत महिलांचा सहभाग - ........................................ ३२८
एक समाजशास्त्रीय अभ्यास
**कांबळे किशोर दिलीप**

६५. पंचायत राज्याच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण ........................... ३३१
**सौ. वैशाली विकास शेवाळे**

६६. महिला सक्षमीकरण : पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग .......... ३३६
**श्रीमती जाधव एस. टी.**

६७. पंचायत राज व्यवस्थेत स्त्रियांचा सहभाग .......................................... ३३८
**शेख बशीर शब्बीरसाहेब**

६८. पंचायतराज व्यवस्था आणि महिला सबलीकरण ..................................... ३४१
**प्रा.डॉ.बालाजी विजापुरे, महेश आनंदराव मगर**

**बचतगट आणि महिला सक्षमीकरण**

६९. बचत गट आणि महिला सक्षमीकरण ................................................... ३४६
**प्रा. डॉ. रसाळ दैवशाला चत्रभूज**

७०. स्त्रियांच्या सक्षमीकरणामध्ये बचत गटाची भूमिका : ............................. ३५१
एक समाजशास्त्रीय अभ्यास
**डॉ. कृष्णा शेंडे**

७१. समाजकल्याण प्रशासनात स्वयंसहाय्यता ............................................ ३५५
महिला समूह/गटाची भुमिका
**प्रा.डॉ. उलगडे एल.के., सौ. उलगडे अनुजा लक्ष्मण**

Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

# 61.

# प्रतिनिधीत्वाचा मुद्दा - महिला आरक्षण

माधव [illegible]
देगलूर महाविद्यालय, [illegible]

सर्व विश्वात प्राचीन काळपासून आजतागायत स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकारणात दुय्यम स्थान दिलेले आहे. भारतात रामायण आणि महाभारतकालीन समाजात आणि आजही पुरूषांनी स्त्रीयांना दुय्यम स्थान देवून उपभोगाची वस्तु बनविलेली आहे.

**लिंगावर आधारित भेदभाव :-**

**धर्म आणि लिंग -** पती हा ईश्वर असतो. स्त्री ही अबला असते. स्त्रीयांना पुरूष सहारा देतात. **पुरूष आणि लिंग -**पतीची दासी, आई, पत्नी, बहिण, मुलींच्या रूपात. **महिला आणि लिंग** - सासु, सुन, ननंद अर्थात स्त्रीच, स्त्रीचे शोषण करते. **कुटुंब नियोजन आणि लिंग-**कुटुंब नियोजन महिलांनीच करावे, त्यात तांबी, गर्भपात, गोळ्या इत्यादी.

**राजकारण आणि महिला :-**

महिलांची उन्नती व विकास होण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तिच्या क्षमतेनुसार विकास करण्याची संधी देणे आवश्यक आहे. विशेषत: राजकीय सहभाग वाढवून सशक्तीकरण करणे आवश्यक आहे.

स्त्री-पुरूषात समानता, स्त्रीयांना स्वत:च्या क्षमतेनुसार पूर्ण विकास करण्याची अधिकार, स्वत:संबंधी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यासाठी राजकिय सहभाग वाढविणे आवश्यक आहे. महिलांच्या आंदोलनामुळे काही प्रश्न सुटलेले आहेत, पण तिला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वंचितच राहावे लागले आहे.

संविधानाने स्त्री-पुरुषांना समान राजकिय अधिकार देवूनही व्यवहारात महिलांची राजकिय हिस्सेदारी फारच कमी आहे, संसद आणि राज्यांच्या विधिमंडळात पुरूषांच्या तुलनेत प्रतिनिधीत्व कमी आहे. 2009 च्या लोकसभा निवडणूकीत 556 महिला उमेदवारांपैकी फक्त 59 महिला विजयी झाल्या होत्या. 2004 च्या लोकसभा निवडणूकीत 45 तर 1996 च्या 56 महिला विजयी झाल्या होत्या. 16 व्या 2014 च्या लोकसभा निवडणूकीत 631 महिला उमेदवार उभा टाकल्या त्यापैकी 62 विजयी झाल्या. महिलांची लोकसभेतील टक्केवारी 11% आहे.

ISBN 978-93-5240-941-6

महिलांच्या राजकीय सहभागातील बाधा महिलांची सामाजिक स्थिती - महिलांचे कार्य खूप आणि मूल तसेच सांविधानात्मक संस्थांची संधी मिळाली तरी निवडणूक पुढील कामाची जबाबदारी घरकाम आणि बाहेरचे तसेच राजकीय स्थिती यात समन्वय निवडणुका हा आर्थिक पैसा आणि बळाचा वापर हे पुरुषच करू शकतात. महिलांना हे मिळविणे अवघड, राजकीय पक्षांची सुत्रे पुरुषांकडेच आहेत. इत्यादी.

**संविधानात्मक दुर्बलांसाठी तरतुदी :-**

संविधानकारांनी सामाजिकदृष्ट्या वंचित व आर्थिकदृष्ट्या शोषितांचे हित साधण्यासाठी व त्यांचा विकास करण्यासाठी संविधानात तरतुदी केलेल्या आहेत.

अनुच्छेद १५ (४) नुसार शासन सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या अनुसूचित जाती, जमाती तसेच मागास प्रवर्गासाठी विशेष तरतुदी केलेल्या आहेत.

अनुच्छेद १६ (४) नुसार शासनाला असे वाटले की, मागासवर्गीयांना प्रशासनात पुरेसे प्रतिनिधीत्व नाही तर अशा घटकांना राखीव जागांचे प्रावधान केलेले आहे.

अनुच्छेद ४६ नुसार दुर्बल घटकांना म्हणजे मागासलेल्या घटकांना, नोकऱ्या, प्रशासनात विशेष संधी देण्यात याव्यात.

अनुच्छेद ३८ (२) नुसार शासन आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी मागासांना पहाणारी सोयी सुविधा देवू शकते.

संविधानात अनुसूचित जाती, जमाती कोणत्या आहेत, याची नोंद केलेली नाही. प्रत्येक घटक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये कोणत्या जाती, जमाती या वर्गीकरित येऊ शकतात, हे ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. त्यामुळे प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील अनु.जाती, जमाती भिन्न आहेत. राज्यांच्या संदर्भात संबंधीत राज्यपालांशी चर्चा करून राष्ट्रपती अधिसूचना जारी करतात.

अनुच्छेद ३३० नुसार अनुसूचित जाती, जमातींना लोकसभेत लोकसंख्येनुसार आरक्षित जागा असतील, तर अनुच्छेद ३३२ नुसार राज्यातील विधानसभेत अनु.जाती जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल, सुरुवातीला हे आरक्षण १० वर्षांसाठी ठेवण्यात आले होते, परंतु १९६० सालापासून सातत्याने हे आरक्षण १० वर्षांसाठी वाढविण्यात आले. सध्या ९५ व्या, १०९ व्या घटना दुरुस्ती विधेयकाने हे आरक्षण २०१० ते २०२० कालावधीसाठी वाढविण्यात आले.

अनुच्छेद १६४ (१) नुसार प्रत्येक राज्यांच्या मंत्री परिषदेमध्ये अनुसूचित जाती, जमाती, मागासांच्या विकासासाठी एक मंत्री असेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. उदा. मध्यप्रदेश ओरिसा झारखंड व छत्तीसगढ या राज्यात ९४ वी घटनादुरुस्ती २००६ नुसार अनुसूचित जाती, जमाती मागासवर्गीयांच्या कल्याणाची विशेष जबाबदारी सोपविली आहे.



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

अनुच्छेद ३३८ नुसार राष्ट्रपती अनुसूचित जाती, जमातींच्या लोकांना विशेष संरक्षणाचा उपाय म्हणून तसेच त्यांच्या स्थितीची चौकशी करून माहिती देण्यासाठी एका विशेषाधिकाऱ्यांची नियुक्ती करतो. अनुसूचित जाती-जमातींच्या रक्षणासाठी एक बहुउद्देशीय समिती २१ जूलै १९७८ मध्ये अस्तित्वात आली, त्यानंतर अनुसूचित जाती, जमाती आयोग म्हटले जाऊ लागले. १९८० मध्ये नाव बदलून राष्ट्रीय अनुसूचित जाती, जमाती आयोग करण्यात आले. १९९० ला ६५ व्या संविधान संशोधनाने ३३८ व्या कलमात अनुसूचित जाती, जमाती यांना दिलेले अधिकार आणि सुरक्षात्मक उपाय यांच्या चौकशीचे अधिकार आहेत, याचे स्पष्टीकरण करण्यात आले.

अनुच्छेद २७२ (१) नुसार राज्यातील अनुसुचित जाती, जमातीच्या प्रदेशांना त्यांच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन आर्थिक अनुदान देईल.

**मागासवर्ग :-**

मागासवर्ग ठरविण्यासाठी पहिल्यांदा १९५३ साली काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिला मागासवर्गीय आयोग स्थापन करण्यात आला. मागासवर्गीयांचे निकष ठरविण्यावरून सदस्यांमध्ये वादविवाद झाल्याने शिफारशींची अंमलबजावणी झालेली नाही. १९७९ ला बी.पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग नेमण्यात आला. व्ही.पी. सिंग सरकारने या आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या. ओ.बी.सी ना सरकारी नोकऱ्यात २७% आरक्षण देण्यात आले. १९९३ मध्ये राष्ट्रीय मागासवर्ग अधिनियम संमत करण्यात आला. त्यानुसार अनुच्छेद ३४० नुसार मागासवर्गाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोग निर्माण करण्यात आला.

**अल्पसंख्यांकांसाठी :-**

संविधानात धार्मिक,भाषिक, अल्पसंख्यांकांचा उल्लेख आहे. संविधानात अल्पसंख्यांकाची व्याख्या दिलेलली नाही. केंद्र शासनाने मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौध्द आणि झोरास्ट्रीन्स या पाच समुदायांना धार्मिक अल्पसंख्यांक म्हणून सुचित केलेले आहे.

अनुच्छेद २९ नुसार अल्पसंख्याकांना आपआपली भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा हक्क आहे. तसेच अनुदान प्राप्त शिक्षण संस्थांमध्ये धर्म, भाषा, जात, या आधारे भेदभाव करता येत नाही.

अनुच्छेद ३० नुसार धार्मिक, भाषिक, अशा अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा, चालविण्याचा हक्क आहे. अशांनाही अनुदान देता येते, याबाबतीत भेदभाव नाही.

**आंग्ल भारतीय समाजासाठी :-**

संविधानाने आंग्ल भारतीय समुदायाचा अर्थ निश्चित केलेला नाही, आंग्ल व्यक्ती



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

म्हणजे अशी व्यक्ति जिचे वडिल किंवा तिच्या पुरुषवंशातील कोणतीही पुरुष व्यक्ती, पश्चिमात्यवंशीय कुळातील आहे, ती भारतीय अधिवासी आहे, जिचा जन्म तिच्या पालकांच्या प्रदेशात झाला आहे ती व्यक्ती होय.

अनुच्छेद ३३१ नुसार लोकसभेत राष्ट्रपती दोन ॲंग्लो भारतीय समुदायांच्या प्रतिनिधींना नियुक्ती करू शकतो.

अनुच्छेद ३३३ नुसार राज्यांच्या विधानसभेत राज्यपाल दोन ॲंग्लो भारतीय समुदायांच्या प्रतिनिधींची नेमणूक करू शकतो. हे आरक्षण ९५ व्या १०९ वे घटनादुरुस्ती विधेयकाने २०१०-२० पर्यंत वाढविले आहे.

**पंचायती राज आणि महिला आरक्षण :-**

७३, ७४ वे संविधान संशोधन (१९९३) करून संविधानात ९ व्या भागात कलम २४३ समाविष्ट करण्यात आले तसेच ११ वे परिशिष्ट २९ बाबी राज्यशासनाने पंचायती राज्यसंस्थेकडे हस्तांतरीत करण्यात आल्या.

अनुच्छेद २४३ (१) नुसार अनु.जाती, जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा असलेल्या पैकीच १/३ जागा त्या गटातील महिलांसाठी आरक्षित असतील. तिन्ही स्तरावर एकूण निर्वाचित जागांपैकी १/३ जागा महिलांसाठी आरक्षित असतील, राखीव जागा असणारे मतदार संघ चक्राकार पध्दतीने निर्धारित करण्यात येतील.

त्याचप्रमाणे तिन्ही स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या जागामध्ये अनु.जाती, जमाती व महिलांसाठी १/३ अधिकारपदे राखीव असतील ही राखीव पदे चक्राकार पध्दतीने निर्धारित केले जातील.

महिला आरक्षणामुळे ग्रामीण आणि नागरी भागात महिलांचा राजकिय सहभाग वाढला आहे. सुशिक्षित शहरी स्त्रिया तर आत्मविश्वासाने स्थानिक स्वराज्यात वावरू लागल्या आहेत, परंतु निरक्षर स्त्रीयांही आप आपल्या प्रश्नावर निर्भिडपणे रस्त्यावर उतरत आहेत. या आरक्षणामुळे स्त्रीया स्थानिक राजकारणात सक्रिय झालेल्या आहेत.

**महिला आरक्षण विधेयक :-**

सुरुवातीला स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात १९१७ मध्ये सरोजिनी नायडूने महिलांच्या राजकिय प्रतिनिधीत्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी या मागणीचा अर्थ प्रौढ, समान अधिकारासंबंधी होता. १९३५ च्या सुधारणा अधिनियमाने हा अधिकार महिलांना प्रदान केला, परंतु हा अधिकार संपन्न व शिक्षीत महिलांनाच होता.

महिलांची स्थिती सुधारण्यासाठी नियोजन केलेल्या समितीने १९७४ मध्ये आपल्या अहवालात महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये (नागरी व ग्रामीण) आरक्षण द्यावे, त्याच

ISBN 978-93-5240-041-6

समितीतील दोन सदस्यांनी विधिमंडळात आरक्षणाची मागणी केली. १९८८ च्या नॅशनल प्रस्पेक्टिव्ह प्लानमध्ये ग्रामीण नागरी स्वराज्य संस्थामध्ये राजकीय पक्षामध्ये ३०% आरक्षणाची शिफारस केली होती.

**महिला आरक्षणाचे मुख्य मुद्दे :-**

१. लोकसभा आणि राज्यविधानसभेत महिलांना ३३% आरक्षण असेल हे आरक्षण संसदेद्वारे निर्मित संस्थेद्वारे निर्धारण केले जाईल.

२. लोकसभा आणि राज्य विधानसभेत लोकसंख्येच्या प्रमाणात जे आरक्षण अनुसूचित जाती जमातींना आहे त्यातच त्याच जातीच्या महिलांना १/३ आरक्षण असेल.

३. सर्व महिलांना समान आरक्षण असेल, अनुसूचित जाती, जमातींना स्वतंत्र आरक्षण नाही.

४. महिला आरक्षण लागू झाल्यानंतर १५ वर्षाला त्याची समिक्षा केली जाईल.

५. राज्यसभा आणि विधानपरिषदेसाठी स्वतंत्र आरक्षणाच्या प्रावधानाची आवश्यकता.

**लोकसभा :-**

लोकसभेत महिला आरक्षित जागा विभिन्न राज्ये, केंद्रशासित प्रदेशात रोटेशन प्रणालीनुसार केले जाईल. ज्या केंद्रशासित अथवा राज्यात लोकसभेची एकच जागा आहे. तेथे तीन निवडणूकांच्या पहिल्या निवडणूकीत महिलांना आरक्षण असेल. हाच नियम अनुसूचित जाती जमातीनाही असेल.

**विधानसभा :-**

१. सर्व राज्यातील विधानसभेत एकूण सदस्यांचा १/३ संख्या ही महिलांसाठी आरक्षित असतील. आरक्षित जागा रोटेशन पध्दतीने निर्धारीत केली जाईल.

२. अनुसूचित जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असेल त्यातीलच १/३ जागा अनुसूचित जाती, जमातींना असेल (लोकसभेप्रमाणेच)

**महिला आरक्षणाचा घटनाक्रम :-**

**१२ सप्टेंबर १९९६ :-**

एच.डी. देवगौडा सरकारने महिला आरक्षण विधेयकाला ८१ व्या संविधान संशोधन विधेयकाच्या रुपात संसदेत मांडण्यात आले परंतू कांही दिवसातच दैवगौडा सरकार अल्पमतात आली. त्यामुळे ११ वी लोकसभा भंग करण्यात आली.

**१४ डिसेंबर १९९८ :-**

भाजपाच्या रालोआ सरकारने महिला आरक्षण विधेयकाला १२ व्या लोकसभेत ८४ व्या संविधान संशोधनाच्या रुपात प्रस्तुत करण्यात आले. यावेळी पण वाजपेयी सरकार अल्पमतात

ISBN 978-93-5240-041-6

आल्याने १२ वी लोकसभा भंग करण्यात आली. त्यामुळे बील संमत होवू शकले नाही.

**२२ नाव्हेंबर १९९९ :-** दुसऱ्यांदा रालोआ सरकारने १३ व्या लोकसभेत महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले. पण सहमती अभावी हे विधेय संमत झाले नाही. परत २००२ आणि २००३ मध्ये परत महिला आरक्षण प्रस्तुत करण्यात आले. याला काँग्रेस आणि डाव्यांनी पाठींबा दिला पण तरीसुध्दा हे विधेयक संमत झाले नाही.

**मे २००४ :-** मध्ये काँग्रेसच्या संपुआने त्यांच्या जाहिरनाम्यात महिला आरक्षण विधेयक संमत करण्याचे ठरविले.

**६ मे २००८ :-** हे विधेयक राज्यसभेत मांडण्यात आले कायदा आणि न्यायसंबंधी स्थायी समितीकडे पाठविण्यात आले.

**१७ डिसेंबर २००९ :-** स्थायी समितीने परत हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवण्यात आले पण समाजवादी पार्टी, जनतादल युनायटेड आणि राष्ट्रीय जनता दलाच्या विरोधामुळे हे विधेयक मंजूर झालेले नाही.

**२२ फेब्रुवारी २०१० :-** राष्ट्रपती प्रतिभाताई पाटलांने आपल्या संसदेच्या अभिभाषणात सांगितले सरकार महिला आरक्षणाला लवकर संमत देईल. २५ फेब्रुवारी २०१० ला केंद्रीय मंत्रीमंडळाने महिला आरक्षणाला अनुमोदन दिले. ०८ मार्च २०१० ला बील राज्यसभेत मांडण्यात आले पण सभागृहात राजद,सपाने हंगामा निर्माण केल्याने मतदान झाले नाही ९ मार्च २०१० ला राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक बहुमताने संमत केला.

**आरक्षण विधेयकातील प्रमुख वादाचे मुद्दे :-** महिला आरक्षण विधेयक राजकीय पक्षामध्ये एकमत होण्याच्या अभावी आतापर्यंत पास झालेले नाही. आघाडी शासनातील विभिन्न पक्षांच्या मतभेदाच्या भुमिकेमुळे हे विधेयक संमत झालेले नाही.

१. समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, बहुजन समजावादी पार्टी, संयूक्त जनता दल, लोकजनशक्ती, या पक्षांच्या मते ३३% मध्येच अनु.जाती, जमाती, मागासवर्ग, अल्पसंख्यांकांना स्वतंत्र आरक्षण दयावे तरच मागासवर्गीय महिलांना राजकारण प्रतिनिधीत्व मिळेल आणि त्यांचा विकास होईल अन्यथा उच्च जातीच्या महिलांनाच या आरक्षणाचा लाभ मिळेल.

२. काँग्रेस, भाजपा आणि डाव्या पक्षांची भूमिका ही सध्याचे जे महिला आरक्षण विधेयक आहे ते पास करणे आवश्यक आहे.

३. काँग्रेसने राजकीय पक्षांनीच लोकसभेत आणि राज्यविधानसभेच्या निवडणूकीत जातीच्या संवर्गानुसार अनु-जाती, जमाती, ओ.बी.सी. च्या महिलांना उमेदवारी दयावे असे झाले तर सर्व जातींच्या महिलांना प्रतिनिधीत्व मिळेल. म्हणून हे विधेयक पास करणे गरजेचे आहे.

४. भाजपाच्या मते लोकसभेची संख्या वाढविण्यात यावी आणि मग ३३% महिलांना



Scanned with CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

आरक्षण दयावे त्यामुळे पुरूषी प्रतिनिधीत्व कमी होणार नाही.

**लोकशाहीतील प्रतिनिधीत्वाचे चर्चा :-**

भारत आणि सर्व विश्वामध्ये प्राचीन काळापासून आजपर्यंत स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिकआणि राजकीय क्षेत्रात अत्याधिक दुय्यम स्थान मिळालेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे पुरूषप्रधान संस्कृती असल्याने स्त्रीयांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. स्त्रीया ह्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत. संविधानात कलम १५ (४) १६ (४) ४६ नुसार सामाजिक मागासलेपणा आणि शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषावर दुर्बल घटनांना सरकार प्रशासन, राजकरण आणि शिक्षणात पक्षपाती सुविधा देईल. अर्थात सामाजिक न्यायाद्वारे झुकते माफ दिले जाईल. त्यांना विकासाची संधी दिली जाईल. भारतीय समाजातील स्त्रीया हया सुध्दा दुर्बल घटकात शोषित आहेत. त्यांना मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थांतर दिलेले आहे. विशेषत: राजकीय क्षेत्रात महिलांचे प्रतिनिधीत्व अत्यल्प आहे. म्हणून स्त्रीयांना सामाजिक मागासलेला, दुर्बल या निकषाच्या आधारे राजकरणात पुरेसे प्रतिनिधीत्व देण्यासाठी महिला आरक्षण विधेयक मांडण्यात आले. या विधेयकात महिलांना ३३% जागा आरक्षित देण्यात याव्यात असा उद्देश आहे. प्रतिनिधीत्व दावे आणि सामाजिक न्यायाची मागणी परस्पर पुरक आहे.

राजकीय ज्ञानात वाढ झाल्याने समाजातील जात, धर्म, स्त्री, पुरूष वर्ग, गट प्रतिनिधीत्वाची मागणी करतात.

१. स्वतंत्र राज्याच्या मागण्या.
२. महिला आरक्षणाची मागणी.
३. आर्थिक निकषावर आधारीत मराठा समाजाची मागणी.
४. नक्षलवादयांची मागणी.

**संदर्भसूची :-**

१. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, २००३ भारतीय गणराज्यांचे शासन आणि राजकरण. पिंपळापुरे अॅन्ड पब्लिशर्स नागपूर.

२. तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, जाने २०११ भारतीय राज्यघटना व घटनात्मक विकास, खंड (१) द युनिक अकॅडमी पुणे पेज २५०

३. डॉ. भास्कर भोळे, २०११ ऑगस्ट, भारतीय शासन आणि राजकरण, पिंपळापूरे प्रकाशन नागपूर पेज २९५

***



Scanned with CamScanner